# संगमेश्वर कॉलेजचे कुस्ती स्पर्धेमध्ये यश

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत सोलापूर महानगरपालिका आयोजित शालेय शहरस्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या खेळाडूंनी यश संपादन केले.

समर्थ केत 80 किलो मध्ये प्रथम, ओंकार कांगरे 72 किलो मध्ये प्रथम, दक्ष काशेकर 70 किलो मध्ये द्वितीय, ऋषी केंभावी 110 किलो मध्ये प्रथम, आदर्श मस्के 65 किलो मध्ये प्रथम क्रमांक पटकावून यश संपादन केले.

या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले.

या खेळाडूंना श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिवा ज्योती काडादी, प्राचार्य डॉ .ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा.प्रसाद कुंटे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

**फोटोओळी**

कुस्ती खेळाडू समवेत प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, शैक्षणिक सल्लागार डॉ. पी एम दर्गोपाटील ,

उपप्राचार्य प्रा. प्रसाद कुंटे,शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा. संतोष खेंडे व प्रा. विक्रांत विभूते.

